राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या आस्थापनेवरील प्रबंधक (विधि) या पदावर न्यायिक सेवेतील अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : ग्रासंअ २०२६/प्र.क्र. ४७/ग्रासं-४**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ३२.**
**दिनांक : २२ मे, २०२६**

वाचा: १) ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९
२) शासन निर्णय क्र. ग्रासंअ २०२२/प्र.क्र.४४/ग्रा.सं-४, दि.१०.०६.२०२२
३) मा. उच्च न्यायालय यांचे बदली आदेश दि. २१.०२.२०२६
४) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मंबई यांचे पत्र क्र. राआ/महा/आस्था/नियुक्ती / प्रबं(विधी)/२०२६/२००४, दि.२७.०४.२०२६.

**शासन निर्णय:**

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या आस्थापनेवरील प्रादेशिक खंडपीठ, नागपुर येथील प्रबंधक (विधि) या पदावर न्यायिक सेवेतील अधिकाऱ्याची संदर्भ क्र.२ नुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. या न्यायिक अधिकाऱ्याची बदली वरिष्ठ दिवाणी न्यायाधिशांच्या वार्षिक सर्वसाधारण बदल्या-२०२६ अंतर्गत मा.उच्च न्यायालयाच्या दि.२१.०२.२०२६ च्या आदेशान्वये इतरत्र करण्यात आल्या असून अन्य १ न्यायिक अधिकाऱ्याची बदली प्रबंधक (विधि), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, खंडपीठ नागपूर या पदावर दर्शविण्यात आली आहे. महाप्रबंधक, उच्च न्यायालय यांनी त्यांच्या दि.२१.०२.२०२६ च्या आदेशान्वये श्रीमती सोनल एस. पाटील यांची प्रबंधक (विधि) या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबत शिफारस केली असून या शिफारशीनुसार शासन स्तरावरुन नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची विनंती राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांच्या संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे.

२. महाप्रबंधक, उच्च न्यायालय यांची शिफारस आणि ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ मधील कलम ४६(१) मधील तरतूदीस अनुसरुन खालील न्यायिक अधिकाऱ्याची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी तीन वर्षे किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत प्रतिनियुक्तीने नियुक्ती पुढील प्रमाणे करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व सध्याची पदस्थापना | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | श्रीमती सोनल एस. पाटील<br>दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, खेड राजगुरूनगर,जिल्हा पुणे | प्रबंधक (विधि), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, खंडपीठ नागपूर. |

३.        उपरोक्त अधिका-याच्या वेतन-भत्त्याच्या प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्र.एम-२ मुख्य लेखाशिर्ष २४०८-अन्न साठवण व वखार साठवण, (०४) (००) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत राज्य ग्राहक संरक्षण परिषद, राज्य आयोग आणि जिल्हा मंचाची स्थापना (०४) (०१) मुंबई शहर दत्तमत (२४०० ०२५१) (०१)- वेतन (०४) (०२) मुफसल दत्तमत (२४०० ०२६२) (०१)- वेतन या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४.        उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०५२२११४५३९८२०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C521002555E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.05.22 11:46:29 +05'30'

**(प्रमोद पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण , यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव
३) मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व परीक्षा), महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर
७) प्रबंधक, (प्रशासन) / (विधी), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई
८) प्रबंधक, (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, परिक्रमा खंडपीठ, नागपूर
९) श्रीमती सोनल एस. पाटील, दिवाणी न्यायाधीश , वरिष्ठ स्तर , खेड राजगुरूनगर,जिल्हा पुणे यांना प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचेमार्फत.
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
१२) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१३) निवडनस्ती ग्रासं-४.